DAY — **16** SEAT NUMBER | | | | | | |

2025 | III | 04 **1500** **J-380** **(M)**

FIELD TECHNICIAN- OTHER HOME APPLIANCES (F6)

(REVISED COURSE)

Time : 3 Hrs. **(6 Pages)** **Max. Marks : 80**

सूचना : *(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*

(२) आवश्यक तेथे सुबक आकृती काढा.

(४) उजवीकडे दाखविलेल्या संख्या पूर्ण गुण दर्शवितात.

(५) सर्व प्रश्नांच्या उत्तरांचा प्रारंभ नवीन पृष्ठांवर करावा.

प्र. १. (अ) खाली दिलेल्या पर्यायांतून योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा : (५) **[२०]**

(१) मिक्सरच्या सुरक्षेसाठी ------ वापरले जाते.

(अ) मोटार (ब) ओव्हरलोड स्विच

(क) शाफ्ट (ड) जार

(२) प्रेझेंटेशनवरील स्लाईड सेव करण्यासाठी -------- की चा वापर केला जातो.

(अ) Ctrl + S (ब) Ctrl + V

(क) Ctrl + C (ड) Ctrl + P

(३) आपल्याला काय हवे आहे, ते कसे साध्य करायचे, हे समजण्यास आपल्याला ------ मदत करते.

(अ) प्रेरणा (ब) सकारात्मक दृष्टिकोन

(क) गोल सेटिंग (ड) यांपैकी नाही

(४) फळे आणि भाज्या ठेचणे व कापण्यासाठी ------ चा वापर केला जातो.

(अ) इस्त्री (ब) मिक्सर

(क) ग्राईंडर (ड) ज्यूसर

(५) मायक्रोवेव्ह ओव्हनमध्ये जास्त करंट (overload current) संरक्षणासाठी ----- वापरले जाते.

(अ) सर्किट ब्रेकर (ब) फ्यूज

(क) रिले (ड) यांपैकी नाही

(ब) खालील दिलेल्या जोड्या जुळवा : (५)

'अ' गट	'ब' गट
(अ) मायक्रोवेव्हचे स्रोत	(१) ABS प्लास्टिक
(ब) सदोष इन्सुलेशन	(२) ई-कचरा व्यवस्थापन
(क) संघटनात्मक कौशल्य	(३) मॅग्नेट्रॉन
(ड) मिक्सर बेस युनिट	(४) विद्युत धोका
(इ) प्रदूषण कमी करणे	(५) वेळेचे व्यवस्थापन

(क) खालील विधाने 'बरोबर' आहेत की 'चूक' ते लिहा लिहा : (५)

(१) मायक्रोसॉफ्ट एक्सेल हे डॉक्युमेंट बनवण्यासाठी वापरतात.

(२) मायक्रोवेव्हमध्ये उष्णता वाहून नेण्याची क्षमता कमी आहे.

(३) सिट्रस ज्युसरमधून फळे किंवा भाज्यांमधून रस काढण्यासाठी यांत्रिक शक्तिचा वापर केला जातो.

(४) स्ट्रेनर द्रवापासून घन पदार्थ वेगळे करण्यासाठी वापरतात.

(५) सदोष मोटारमुळे मिक्सरमध्ये जास्त कंपन होते.

(ड) खालील प्रश्नांची 'एका' वाक्यात उत्तरे लिहा : (५)

(१) स्प्रेडशीटचे कोणतेही दोन घटक लिहा.

(२) मायक्रोवेव्हमध्ये अन्न शिजवण्यासाठी कुठे ठेवले जातात?

(३) पावडर बनवण्यासाठी कोणते ब्लेड वापरले जातात?

(४) कोणता ज्यूसर मॅन्युअली हाताळला जातो?

(५) स्लिप प्रुफ फिटचा वापर काय आहे?

प्र. २. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही चार) : **[१२]**

(१) ओव्हरलोड प्रोटेक्टरचे कार्य लिहा.

(२) खालील अग्निशामक तक्ता पूर्ण करा :

अ.क्र.	वर्ग (class)	पाणी (CO_2)	कोरडी पावडर	फोम
1	A	_____	_____	_____
2	B	_____	_____	_____
3	C	_____	_____	_____

(३) टीप लिहा : सेंट्रीफ्युगल ज्यूसर

(४) सक्रिय श्रवणाचे महत्त्व लिहा.

(५) उद्योजकाची वैशिष्ट्ये लिहा.

(६) जास्त व्होल्टेज आणि करंटवर चालणाऱ्या मायक्रोवेव्ह ओव्हनच्या भागांची नावे लिहा.

प्र. ३. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही चार) : **[१२]**

(१) कृती पूर्ण करा :



(२) जारचे कार्य लिहून त्याचे प्रकार स्पष्ट करा.

(३) टीप लिहा – सोलो मायक्रोवेव्ह ओव्हन

(४) खालील भागांची कार्ये स्पष्ट करा :

(१) ज्युसिंग स्क्रू (juicing screw)

(२) पल्प कप (pulp cup)

(१) प्लन्जर (plunger)

(५) प्रथमोपचार पेटीतील साहित्यांची नावे लिहा.

(६) सकारात्मक दृष्टिकोन राखण्यास मदत करणारे मार्ग लिहा.

प्र. ४. खालील प्रश्नांची उत्तरे सविस्तर लिहा (कोणतेही तीन) : **[१२]**

(१) मायक्रोवेव्ह ओव्हनच्या अंतर्गत भागांची यादी करा.

(२) ज्यूसरमधील समस्यांचे समाधान लिहा : बेस युनिट चालू होत नाही.

(३) खालील तक्ता पूर्ण करा :

अ.क्र.	वाक्य	कर्ता	क्रियापद	कर्म
१.	मी पत्र लिहिते			
२	त्याने ग्राहकाला बोलावले			

(४) मायक्रोवेव्ह ओव्हनच्या ऑपरेशनची आकृती काढा.

(५) खालील आकृती पूर्ण करा :



प्र. ५. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही तीन) : **[१२]**

(१) खालील आकृतीस नावे लिहा :



(२) इलेक्ट्रीसिटीवर काम करताना कोणते सुरक्षेचे नियम पाळावे?

(३) खालील तक्ता पूर्ण करा :

अ. क्र.	शॉर्टकट की	वापर
1	Ctrl + C	_____
2	Ctrl + P	_____
3	Ctrl + V	_____
4	Ctrl + S	_____

(४) मिक्सरमधील फ्यूजच्या चाचणीसाठीच्या पायऱ्या लिहा.

(५) ज्यूसरच्या वापरानंतर ज्यूसरची काळजी कशी घ्याल?

प्र. ६. (अ) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सविस्तर लिहा : (६) **[१२]**

(१) मिक्सरमधील संभाव्य दोष व त्यांची कारणे लिहा :

(अ) मिक्सर चालू होत नाही

(ब) मोटर कमी गतीने फिरते

(क) मोटर सुरू असताना आवाज येतो व लवकर गरम होतो

(२) खालील आकृती पूर्ण करा :



(ब) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर सविस्तर लिहा : (६)

(१) इलेक्ट्रिक शॉर्टसर्किट मुळे लागणाऱ्या आगीसाठी कोणती काळजी घ्यावी?

(२) ज्यूसर वापरण्यापूर्वी सुरक्षा उपायांची यादी करा.

◆◆◆